सोमवार, २० डिसेंबर २०२१ | पुढारी | ३

माझा जिल्हा

# क्रीडानैपुण्य वाढविण्याचे आव्हान

## अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाकाळात महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्य निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडा शिक्षकांसमोर आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीअंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी पोलिस निरीक्षक सतीश गुरव, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

शरीरसौष्ठव स्पर्धेत ए.एस.सी. महाविद्यालय, इंदापूरने विजेतेपद पटकाविले. बाबूरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमित बाईजने 'बेस्टपोझर', तरसी.एस.अँड.सी.महाविद्यालय, माळेगावचा संकेत काळे याने आंतरमहाविद्यालयीन "श्री २०२०-२१" हा किताब संपादन केला.

नीलेश धावरे, सुमीत बाईज, काझी मोहम्मद सैफ, तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी वेगवेगळ्या वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. वेटलिफ्टिंगमध्ये इंद्रायणी महाविद्यालयाला विजेतेपद, तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना घोजगे, सृष्टी थोरात, प्रतीक्षा कड्, मृणाली भोंग, रुचिका ढोरे यांनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला.

वेटलिफ्टिंग मुलांमध्ये दिग्विजय गोटकुले, ऋषिकेश चव्हाण, सुमित दळवी, ओंकार बोरकर, किरण जगताप, वरद वाघ, वैष्णव ठाकूर, चिराग वाघुले, आयुष खंडागळे, अमित वाळुंज यांनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी 'बेस्ट लिफ्टर' हा किताब मिळविला. या स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्यांची आंतरविभागीय शरीरसौष्ठव व वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शीतल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.